**<u>ठळक बातम्या</u>**

- जीएसटीतल्या कपातीमुळे यंदा बाजारपेठेतली उलाढाल २० लाख कोटी रुपयांनी वाढण्याचा सरकारचा अंदाज

- गेल्या महिन्यात पुरामुळं राज्यात झालेल्या नुकसान भरपाईपोटी आणखी सव्वा ३ हजार कोटी रुपयांच्या मदतीचा शासन निर्णय जारी

- नंदुरबार जिल्ह्यात रस्ते अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, २७ जखमी

- देशभरात धनत्रयोदशीच्या सणाचा उत्साह, दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठा फुलल्या

**आणि**

- तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या कंपाऊंड प्रकारात भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिला ऐतिहासिक कांस्यपदक

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कराच्या दरांमध्ये केलेल्या कपातीमुळं यंदाच्या वर्षी देशात ग्राहकांकडून होणारी खरेदी १० टक्के म्हणजे २० लाख कोटी रुपयांनी वाढेल असा अंदाज सरकारनं व्यक्त केला आहे. केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, पीयूष गोयल आणि अश्विनी वैष्णव यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेला संबोधित केलं. याविषयी सविस्तर जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

***होल्ड कॅप्सूल***

*(जीएसटीतल्या सुधारणांमुळं देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळाली असून सणासुदीच्या काळात इलेक्ट्रॉनिक्स, वाहनं आणि ग्राहकोपयोगी वस्तूंची मोठी खरेदी झाल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज दिली. जीएसटी दरकपातीचे फायदे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याचं त्यांनी सांगितलं. यंदा*

*नवरात्रीदरम्यान विक्रीत विक्रमी वाढ झाली असून गेल्या नवरात्रीच्या तुलनेत यंदा इलेक्ट्रॉनिक वस्तूंची विक्री २५ टक्क्यांनी वाढल्याचं अश्विनी वैष्णव म्हणाले.*

***होल्ड - बाइट अश्विनी वैष्णव***

*अप्रत्यक्ष करांच्या क्षेत्रात सरकारनं केलेल्या या सुधारणांमुळे देशात होणारी गुंतवणूक, उद्योग व्यापारातली उलाढाल, पायाभूत सुविधांवर होणार खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या या खूप मोठ्या सुधारणा असल्याचं पीयूष गोयल म्हणाले.*

***होल्ड - बाइट पीयूष गोयल***

*जागतिक पातळीवर अस्थिर वातावरण असताना देशाच्या आर्थिक वृद्धीचा दर मजबूत आहे. त्यामुळं आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनंही आर्थिक वृद्धीचा अंदाज सुधारून ६ पूर्णांक ६ दशांश टक्के केला आहे, असंही पीयूष गोयल यांनी सांगितलं.)*

**<><><><><>**

यंदा सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी आणखी ३ हजार २५८ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या मदतीचा शासन निर्णय राज्य सरकारनं आज जारी केला. राज्यभरातल्या २३ जिल्ह्यांतल्या ३३ लाख ६५ हजार ५४४ शेतकऱ्यांना या मदतीचा लाभ मिळणार आहे. नागपूर, अमरावती, पुणे, नाशिक आणि कोकण प्रशासकीय विभागातले हे शेतकरी आहेत. या जिल्ह्यांमधल्या २७ लाख ५९ हजार हेक्टर पेक्षा अधिक शेतीचं नुकसान झाल्यानं ही नुकसान भरपाई दिली जाणार आहे. गेल्या आठवडाभरात सुमारे ५ हजार कोटींच्या निधी वितरणाचे आदेश सरकारने काढले आहेत. यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या नुकसानीसाठी साडे ७ हजार कोटींच्या मदतीच्या वितरणाला मान्यता दिल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशातल्या लखनौ इथल्या ब्राह्मोस एअरोस्पेस युनिटमधे तयार झालेल्या ब्राह्मोस क्षेपणास्त्राचं लोकार्पण संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि

उत्तप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत आज झालं. ब्राह्मोस हे केवळ क्षेपणास्त्र नाही, तर भारताच्या वाढत्या स्वदेशी उत्पादन क्षमतेचं प्रतीक आहे, असं प्रतिपादन राजनाथ सिंह यांनी यावेळी केलं. ब्राह्मोसमधे अत्याधुनिक प्रणाली असून ते लांब पल्ल्यावर मारा करू शकतं. वेग, अचूकता आणि शक्ती हे याचं वैशिष्ट्य असल्याचं संरक्षण मंत्री म्हणाले. ब्राह्मोस चमूनं नुकतेच दोन देशांशी चार हजार कोटींचे करार केल्याचंही त्यांनी सांगितलं. यावेळी बूस्टर इमारतीचं राजनाथ सिंह यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

भारताने आपलं पहिलं देशांतर्गत प्रतिजैविक नॅफी-थ्रोमायसिन विकसित केल्याची माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी दिली आहे. ते आज नवी दिल्लीत एका वैद्यकीय कार्यशाळेचं उदघाटन करताना बोलत होते. श्वसन संसर्ग, विशेषतः कर्करोगाचे रुग्ण आणि नियंत्रणाबाहेर असलेल्या मधुमेहासाठी हे प्रतिजैविक प्रभावी ठरणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यात अस्तंभा यात्रेवरून परतत असलेल्या भाविकांची गाडी चांदशैली घाटात दरीत कोसळून झालेल्या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर २७ जण जखमी झाले आहेत. आज सकाळी साडेदहाच्या सुमाराला घाटातल्या वळणावर चालकाचं गाडीवरचं नियंत्रण सुटल्यानं गाडी दरीत कोसळली. तळोदा उपजिल्हा रुग्णालयातल्या डॉक्टरांनी ६ जणांना मृत घोषित केलं, तर दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाताच्या वेळी या गाडीत ३५ ते ४० भाविक होते.

**<><><><><>**

बिहारमध्ये पहिल्या टप्प्यातल्या मतदानासाठी अर्जांची छाननी आज पूर्ण झाली. या टप्प्यात ६ नोव्हेंबरला १२१ विधानसभा मतदारसंघांत मतदान होणार आहे. या उमेदवारांना सोमवारपर्यंत माघार घेता येईल.

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज लोकजनशक्ती पार्टी रामविलास पक्षाचे अध्यक्ष चिराग पासवान यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमधे बिहार विधानसभा निवडणुकीसंबंधी चर्चा झाली. त्याआधी अमित शहा यांनी मुख्यमंत्री नितीश कुमार यांचीही भेट घेतली.

दरम्यान, झारखंड मुक्ती मोर्चानं विरोधकांच्या या निवडणुकीसाठीच्या महाआघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय आज जाहीर केला. बिहारमध्ये ६ जागा लढवणार असल्याची माहिती पक्षाचे सरचिटणीस सुप्रियो भट्टाचार्य यांनी दिली.

**<><><><><>**

दिवाळीचा दुसरा दिवस असलेला धनत्रयोदशीचा सण आज देशभरात सर्वत्र उत्साहात साजरा होतो आहे. घरोघरी नागरिकांनी धनलक्ष्मी, केरसुणी, दागदागिन्यांची पूजा केली. नवनवीन वस्तू, वाहनांच्या खरेदीसाठीही आज बाजारपेठेत उत्साह दिसून येत आहे. इंडिया बुलियन आणि ज्वेलरी असोसिएशननं प्रसिद्ध केलेल्या दरांनुसार मुंबईत सोन्याचे दर तोळ्यामागे १ लाख ३० हजाराच्या पलीकडे गेले आहेत. चांदी पावणे दोन लाख रुपये किलोनं मिळत आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही तेजी असली, तरी आणखी तेजी होईल, या आशेनं अनेकांनी सोनं-चांदीच्या वस्तू, नाणी खरेदीला प्राधान्य दिलं.

**<><><><><>**

चीन इथं सुरू असलेल्या तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेच्या कंपाऊंड प्रकारात भारताच्या ज्योती सुरेखा वेण्णम हिनं कांस्यपदक पटकावून इतिहास रचला. या स्पर्धेत पदक मिळवणारी ती पहिली भारतीय कंपाऊंड तिरंदाज ठरली आहे. कांस्यपदकासाठीच्या सामन्यात तिनं ग्रेट ब्रिटनच्या एला गिबसन हिच्यावर १५० विरुद्ध १४५ गुण मिळवून मात केली.

**<><><><><>**

ग्रीसमध्ये अथेन्स इथं सुरु असलेल्या आय एस एस एफ (ISSF) जागतिक शॉटगन २०२५ स्पर्धेत भारतीय नेमबाज झोरावर सिंह यानं पुरुष गटात कांस्यपदकाला गवसणी घातली. अंतिम फेरीत खराब हवामान आणि अंधुक प्रकाश यावर मात करून त्यानं ५०पैकी ३१ गुण मिळवले आणि तिसरं स्थान मिळवलं.

<><><><><>

गुवाहाटी इथं सुरू असलेल्या बी. डब्ल्यू. एफ. जागतिक बॅडमिंटन कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या तन्वी शर्मा हिनं आज अंतिम फेरीत धडक मारली. तिनं चीनच्या लिऊ सी या हिच्यावर १५-११, १५-९ अशी सहज मात केली. जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचणारी ती अवघी पाचवी भारतीय बॅडमिंटनपटू आहे.

<><><><><>

दक्षिण आफ्रिकेमधल्या केपटाऊनमधे काल झालेल्या गोळीबारात सात जणांचा मृत्यू झाला. हा हल्ला निषेधार्ह असून याचा तपास लवकरात लवकर केला जाईल, असं केपटाऊन पोलिसांनी सांगितलं. या प्रकरणातल्या आरोपींबद्दल कुणाला काही माहिती असेल तर ती कळवावी, असं आवाहन पोलिसांनी नागरिकांना केलं आहे.

<><><><><>

छत्तीसगडच्या कोंडागाव जिल्ह्यात सक्रीय असलेली नक्षलवादी कमांडर गीता उर्फ कमली सलाम हिनं आज पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं. तिच्यावर ५ लाख रुपयांचं इनाम होतं. कालच जगदालपूर इथं काही वरिष्ठ कमांडर्ससह एकंदर २१० नक्षलवाद्यांनीही आत्मसमर्पण केलं होतं.

//<><><><><>//